# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक ६ | मुंबई | डिसेंबर २०१४ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)* **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## ‘‘सर्वसंस्थात्मक’ सुभाष

—सुहासिनी कीर्तिकर

श्री. सुभाष दत्ताराम राव गेले. शेवटी शेवटी त्यांना फार शारीरिक यातना भोगाव्या लागल्या म्हणे. त्याचा विचार केला तर ‘सुटले बिचारे’ अशी प्रतिक्रिया होते. पण ते या अवस्थेत अगदी शेवटी शेवटी होते. म्हणूनच अलीकडील अनेक कार्यक्रमांना त्यांची अनुपस्थिती जाणवायची. त्याआधी असे घडणे अशक्यच होते. आपल्या ज्ञातीतील कोणतीही संस्था असो; त्या संस्थेचा कोणताही कार्यक्रम असो; श्री. सुभाष राव न चुकता उपस्थित असत. काही ठिकाणी उपस्थितीचे अधिक गुण असतात. तसे या संस्थांमध्ये असते तर श्री. सुभाष राव यांनी अधिकचे विशेष गुण मिळवले असते. अगदी पहिल्या रांगेत बसून ते चर्चेत भाग घेत, आपले मत नोंदवीत. विरोधही करीत. कुठलाही कार्यक्रम असू दे; दाद देणारी पहिली टाळी त्यांची असायची. ज्ञातीतील मान्यवरांच्या मरणाला, कारणाला ते असतच. त्या दिवंगत व्यक्तीविषयी चांगले बोल बोलत. खड्या आवाजात, आत्मविश्वासाने आपले मत मांडणे सर्वांनाच जमते असे नाही. सुभाष रावना ते उत्स्फूर्तपणे, सहजभावाने जमत असे. बरे; हा काही पुढे पुढे करण्याचा वा मिरवण्याचा भाग नसे. संस्था कोणतीही असो; ती त्यांची आपली संस्था असे. नवी वाडीची जत्रा या अमावस्येपासून सुरू होईल. त्यावेळी त्यांची अनुपस्थिती तीव्रतेने जाणवेल. या जत्रेसाठी महानगरपालिकेचा परवाना आणणे, पालखीबरोबर मिरवणे अशी कामे ते आपली समजून करीत. ज्ञातीहक्काच्या देवळांमध्ये तर ते रोजच्या रोज हक्काने आपली सेवा रुजू करीत. या त्यांच्या नित्याच्या उपासनेसाठी सन्मानाने त्यांना गौरविण्यातही आले होते. ‘प्रभु सेमिनरी’चे अध्यक्ष या नात्याने सुरुवातीची काही वर्षे आर्थिक लाभ संस्थेला व्हावा म्हणून नाट्यप्रयोगही त्यांनी लावले होते. काही दिलबहार कार्यक्रम केले होते. ‘प्रभुप्रभात’ असो की ‘प्रभुतरुण’. त्यांच्यासाठी ते ज्ञाती पहाण्याचे दोन डोळेच होते. माननीय प्रमोद नवलकरांना ‘प्रभात’साठी काही हवे असले तर; सुभाष राव आनंदाने तय्यार. ‘प्रभुतरुणा’च्या तर कार्यकारी मंडळावरच त्यांनी कार्यवाह म्हणून बराच काळ काम केले. सुहास कोठारेंच्या काळात ‘प्रभुतरुण’चा महोत्सव झाला. ‘निवडक प्रभुतरुण’चे प्रकाशन झाले. त्याआधी कार्यक्रमस्थळी या पुस्तकाची दिंडी काढण्याची कल्पना श्री. विहंग नायक यांनी राबवली. या दिंडीकरिता पालखी हवी! सुभाष राव तय्यार. त्यांनी ती पालखी आणण्याची व्यवस्था केली, समारंभानंतर पोहोचवण्याची व्यवस्थाही केली. नाहीतर काहीजण आरंभशूर असतात. तसे सुभाष राव अशा कामांत कधीच नव्हते. जबाबदारी घेतली की ती शेवटपर्यंत निभावण्याची त्यांची वृत्ती होती. ‘प्रभुतरुणा’च्या उपनगरातील कार्यक्रमात ‘तरुण’चे अंक हाती देता यावेत म्हणून ते स्वत: बरोबर घेऊन येत. अगदी टॅक्सीचा खर्च संस्थेने जरी केला तरी अशा कार्यक्रमासाठी भरवशाचा ‘नारायण’ नेहमीच हवा असतो. ‘प्रभुतरुणा’च्या कामासाठी दादरच्या पोस्टात जाणे, त्यांचे ऑफिस ‘तरुणा’च्या प्रेसच्या लगतच असल्याने प्रुफांसाठी भेंडोळ्यांची नेआण करणे, मुख्य म्हणजे ‘प्रभुतरुणा’च्या सहाव्या पानासाठी ज्ञातीतील घडामोडी - उदा. - कुणाची पंच्याहत्तरी, कुणाच्या विवाहाचा सुवर्णमहोत्सव, ‘प्रभुतरुणाची डायरी’... आदीसाठी सुभाष राव आपणहून मदत करीत. ज्ञातीतील घडामोडींचा सुभाष राव चालता बोलता माहितीकोश होता! श्री. सुहास कोठारे, श्री. विहंग नायक या भूतपूर्व संपादकांचा हा

(पान २ कॉलम १ वर)

## स्वागत

Let us meet and welcome new members to our family who will actively be responsible for carrying the legacy of Prabhu Tarun ahead.

**Rajesh Navalkar**



Works with a multi national finance company heading legal for the West. He is also a professional fashion & events photographer. Passionate about wildlife and nature photography too, you may check his website www.ssupershots.com, loves road travel, foodie by nature and socialist by heart.

**Mrs Twarita Sanjay Dalvi**
(Nee: Twarita Surendra Vyavaharkar)



BCOM, MBA (HR), interests include light Reading, essay/ poem writing, participating in elocutions, stage acting, etc. Looking forward to interacting with Prabhu Tarun readers and invoking their interest in reading Prabhu Tarun write-ups.

**Mrs. Bhakti Pradhan Shete**



BCOM, BGL, running hand-made jewellery n decorative articles business. Passionate about music, dance, acting, writing and directing.

**Mrs.Mihika Mithil Navalkar**



BMM graduate and an MBA in marketing, a trained Kathak dancer and loves to dance, also loves traveling and exploring new places. Calm and composed by nature, enthusiastic, believes in having a positive attitude towards life and is an avid foodie.

**Mrs. Janhavi Ritesh Kirtikar**



Foremost a homemaker, a Textile Graduate has worked as a garment merchandiser for 8 yrs with Export firm, Creative Garments Pvt Ltd. Hobbies include music, dancing, coordinating, organizing and socializing. Also holds a Diploma in ECCEd, has taught grammar in a school at Dahisar. Also runs a business of events and party organizers called Daisies and Tulips Events, facilitating return gifts for birthdays etc. http://daisiesandtulips.weebly.com, https://m.facebook.com/DaisiesAndTulips

**Dnyanada Pradhan Pawar**

Creativity is not her hobby it's her way of life, armed with a bachelor's degree of Arts in

(पान ६ कॉलम १ वर)

(पान १ कॉलम २ वरून)
‘कोश’ आधार होता. श्री. विहंग नायकांच्या ‘प्रभुतरुणा’च्या कारकिर्दीत मी कार्यकारी संपादिका होते. मला आठवतेय, ‘प्रेस’मध्ये जायचे होते दिवाळी अंकाच्या तयारीकरिता. सुभाष राव मला प्रथम या ‘प्रेस’मध्ये घेऊन गेले. त्यांचा साठावा वाढदिवस याच सगळ्या कृतज्ञतेपोटी ‘प्रभुतरुणा’ने थाटात साजरा केला होता. नंतर कधीतरी पुढे आमची ‘साठी’ झाली. मी, विहंग नायक, सुहासिनी कोठारे, दीपक धैर्यवान वगैरेंची... तीही ‘प्रभुतरुणा’ने आम्हाला अनपेक्षित असा आनंदाचा धक्का देऊन आमच्या नकळत साजरी केली. त्यावेळीही सगळ्या आयोजनात इतर मान्यवरांबरोबर श्री. सुभाष राव यांचा पुढाकार होता. आठवतंय, एकेकाळी ‘सोशल समाजा’च्या निवडणुकात मी उभी रहावे म्हणून सुभाष रावनीच पुढाकार घेतला होता. पुढाकार घेण्यात सुभाष राव सदैव पुढेच!

सुभाष राव असे ‘सर्वसंस्थात्मक’ होते. उत्साही, उत्सवप्रिय होते. समाजकार्य करण्याची त्यांना आच होती. मध्यंतरी श्री. विहंग नायकांच्या ऑपरेशनच्या काळात त्यांचे माझ्याशी संबंध दुरावले होते. पण कुठल्याही समारंभात भेटले की ते ‘प्रभुतरुणा’विषयी आपुलकी व्यक्त करीत. माझ्या संपादकपदाचा मान राखीत. अन् आता तर काय? मरणान्ताणि वैराणी! समाजऋण फेडण्यासाठी काही करत रहायचे; हा मला वाटते त्यांच्या घरातलाच गुण असावा. श्री. सुधीर राव आणि श्री. सुभाष राव हे दोघे बंधू अशा समाजकार्यासाठी बांधील होते. पुढे काळाचा महिमा असा की श्री.सुधीर राव कुठेतरी स्वतःतच हरवले. सामाजिक कार्यक्रमांतून नाहीसे झाले. आता काळामुळे श्री. सुभाष राव यांची कार्यमंचावरून एक्झिट झाली आहे. ते हरवले नाहीत; काळाने त्यांना हिरावून नेले!

असे ‘हिरावलेपण’ मागे राहिलेल्यांसाठी फार दुःखद असते. त्यांना ‘प्रभुतरुणा’तर्फे आदरांजली अर्पण करताना इतकीच इच्छा की हे दुःख पेलण्याचे त्यांच्या कुटुंबीयांना बळ लाभो!

गेल्या अंकात गुरूवर्य शंकर वैद्यांवर लिहिण्याची वेळ आली. या अंकात श्री. सुभाष राव यांच्यावर अटळपणे लिहीले. आता बास! पुढचा अंक जानेवारीचा. म्हणजे नवीन वर्षाचा पहिला अंक. त्याचे संपादकीय स्वागतशीलच असेल! अन् हो! या जानेवारीतील नवीन अंकापासून नवी व्यवस्थापन समिती, नवीन कार्यकारी संपादक मंडळींची भर, नवनवीन बहारदार सदरे, ‘युवामंच’ला वेगळ्या सदराचा खऱ्या अर्थाने युवा चेहरा... असा आशादायी, चैतन्यरूप आकार ‘प्रभुतरुण’ घेणार आहे. जानेवारीच्या अंकासाठी, स्वागतासाठी तय्यार रहा. श्री. सुभाष राव जशी उत्स्फूर्त टाळी देत तशी टाळी देऊन दाद द्या. द्यालच. खात्री आहे. या खात्रीसह साल २०१४ चा निरोप घेते.

२०१४ सालापर्यंत तुम्ही जसा प्रभुतरुणावर लोभ केलात तसाच यापुढेही २०१५ मध्ये राहू द्यात. वाढू द्यात.

## शोकसभा

दिनांक २९-११-२०१४ रोजी श्री. सुभाष दत्ताराम राव यांच्या निधनानिमित्त श्री. कुंदन आगासकर यांच्या पुढाकाराने प्रभु सेमिनरीत शोकसभा आयोजित करण्यात आली. या सभेचे प्रास्ताविक आणि संचालन श्री. कुंदन आगासकर यांनी केले. श्री. प्रताप वेलकर, प्रभु सेमिनरीचे मुख्याध्यापक, डॉ. सुनील राणे, श्री. प्रदीप राणे, सौ. बेला आगासकर, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, सेमिनरी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आदींनी श्री. सुभाष राव यांना श्रद्धांजली वाहिली. सौ. सुरेखा आणि श्री. प्रदीप कोठारे यांचे शोक व्यक्त करणारे पत्र श्री. कुंदन आगासकर यांनी वाचून दाखविले. याप्रसंगी श्री. सुभाष राव यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

३० नोव्हेंबर रोजी अवघी ज्ञाती यात्रेच्या ठिकाणी जमा व्हावी तशी उत्तर भारतीय सभागृहात जमली होती. ‘वाटावा अभिमान अशी ही गुणीजणांची ज्ञाती’ परीक्षांमध्ये स्वतःची मोहोर उठविणाऱ्या गुणवंतांचा सत्कार सोहळा ‘याची देही याची डोळा’ पांहण्यासाठी दरवर्षीच जमते. खरोखरच डोळ्यांचे, मनाचे पारणे फेडणारा हा सोहळा! डॉ. अरविंद वसंतराव पेडणेकर आणि सौ. कलिका पेडणेकर हे प्रमुख पाहुणे लाभलेले. एकोणपन्नास विजेत्यांचे मनोगत, अध्यक्षांचे मनोगत, पाहुण्यांचे भाषण आणि नलिनी तळपदेंच्या लेखणीचा अक्षरस्पर्श झालेल्या गीतांना सौ. रॉनिका विजयकरांसह गायकांनी केलेला सुरेल अमृतस्पर्श श्री. स्वप्नील परांजपे आणि सौ. पाकणीकर यांच्या स्वरसाज यांनी हा सोहळा स्मरणीय केला. सूत्रसंचालन बहारदार होते. ‘नमन नटवरा’ हा नाट्यसंगीताचा कार्यक्रमही रंगला. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या सोहळ्याची आयोजक संस्था ‘पाठारे प्रभु चॅरिटीज’ काटेकोर शिस्त, सुसंस्कारी आयोजन, सेवाभावाचा आदर्श आणि ज्ञातीभावनेचा मूर्त आपलेपणा यामुळे आपली प्रतिमा टिकवून आहे. म्हणूनच या सोहळ्याचे निमित्त साधून देणगीदारांनी देणग्यांचा वर्षाव केला यात नवल ते काय? डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांची विश्वस्तपदी नवनियुक्ती झाली. हेदेखील साजेसेच. या सोहळ्यात प्रसिद्ध होणारी पुस्तिका म्हणजे भविष्यकालीन दस्तावेजच. चॅरिटीजच्या भविष्यशिल्पी कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा.

*

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाज व पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटी खार यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १८ जानेवारी २०१५ रोजी खारच्या पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात दुपारी ३ वाजता पुढील स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

१) **रांगोळी स्पर्धा**- (वेळ १ तास)
विषय- फटाके (कमीत कमी चार) (पंधरा वर्षाखालील)
विषय- दिवाळीचा फराळ (सुकडी)) (कमीत कमी चार) (१५ वर्षावरील)
सूचना- खडू, पट्टी, ठिपक्यांचा कागद अथवा कोणतेही चित्र सोबत नसावे.

२) **चित्रकला स्पर्धा**- (वेळ ३० मिनिटे)
विषय- बगीचा (१५ वर्षांखालील)
विषय- स्वच्छ भारत आभियान (१५ वर्षांवरील)
सूचना- कागद पुरविला जाईल. रंग ज्याचे त्यांनी आणावेत.

३) **हस्तकला स्पर्धा**- (वेळ ३० मिनिटे)
विषय- पट (१५ वर्षांखालील)
विषय- किल्ल्याचे प्रवेशद्वार (१५ वर्षांवरील).
सूचना- फक्त कार्डपेपर पुरविण्यात येईल. सजावटीचे साहित्य ज्याचे त्याने आणावे.

४) **संगीत स्पर्धा**
विषय- हिंदी चित्रपट गीते (१५ वर्षांखालील व १५ वर्षांवरील).
सूचना- साथ संगत उपलब्ध असेल.

५) **फॅन्सी ड्रेस स्पर्धा**- (वेळ ३ मिनिटे)
अ गट - ८ वर्षांपर्यंत
ब गट - ८ ते १५ वर्षांपर्यंत
क गट - १५ वर्षांवरील

६) **एकपात्री अभिनय स्पर्धा** (वेळ ५ मिनिटे)
कमीत कमी दोन विनोदी चुटके सांगणे. (१५ वर्षांखालील)

सर्व ज्ञातीय बंधु-भगिनींनी तसेच बच्चे कंपनीने बहुसंख्येने स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी कराव्यात.

अधिक माहितीसाठी कृपया येथे संपर्क साधावा-
चिटणीसः
सौ. नीता मिलिंद सेंजित- ९८२०१६६६२७
श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर- ९८६७९५८५३५

*

## अभिनंदन

✳ संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर एस. एन. डी. टी. विद्यापीठातर्फे झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी झाल्या. त्यांनी सादर केलेल्या शोधनिबंधास जाणकारांची अपूर्व दाद मिळाली.

✳ श्री. राहुल किरण आगासकर यांना पुणे येथील बाप्पाग्राफी फोटो प्रदर्शनात प्रोफेशनल विभाग दुसरे पारितोषिक प्राप्त झाले.

✳ मुंबई विद्यापीठ संगीत विभागातर्फे झालेल्या कार्यक्रमात कु. शाकंभरी कीर्तिकर यांचे गायन झाले.

✳ केशवसुतांचे स्मरणातून तयार झालेले छायाचित्र डॉ. सुंदरराव भास्करराव वैद्य यांनी काढल्याची माहिती आर्किटेक्ट उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांनी लोकसत्ताच्या ‘वास्तुरंग’मध्ये आवर्जून दिली.

## प्रभुतरुणास देणगी

✳ श्री. मुकुंद सदाशिव गोरक्षकर यांजकडून रु. १५००/-

✳ श्री. सुनील मनोहर जयकर यांजकडून त्यांचे सुपुत्र श्री. विक्रम यांना कन्या झाल्याबद्दल रु. १०००/-

✳ श्री. अतुल भुवनराव राव यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳ श्री. शशांक श्रीपाद विजयकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳ श्री. विजय गजानन धुरंधर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳ श्रीम. चंद्रप्रभा उल्हास कोठारे यांजकडून प्रभुतरुणास रु. २५०/-

**प्रभुतरुणास भाऊबीज**

✳ सौ. जना रवींद्र नवलकरकडून रु. १०१/-

✳ सौ स्मिता अमोल रणजीत कडून रु. १०१/-

सर्व देणगीदारांचे आभार.

*

## माहेश्वरी देवीचा उत्सव

दरवर्षीप्रमाणे दिनांक २२ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१४ या काळात नवीवाडीत देवीचा उत्सव साजरा झाला. अनेक भाविकांनी देवीदर्शनाचा लाभ घेतला. पाठारे प्रभु चॅरिटीजचे नेटके आयोजन होते यासाठी.

लेखांक १२

# माणूस म्हणून-
## नशिबाचा भाग

-डॉ. सुमन नवलकर
(मोबाईल-९८६९०२८९६७)

''किती वर्षांनी भेटतोय रे आपण! बरोबर चाळीस वर्षांनी! ते पण कार्तिकने पुढाकार घेऊन हे आपल्या बॅचचं स्नेहसंमेलन आयोजित केलं म्हणून. नाहीतर कोणास ठाऊक कधी भेटलो असतो ते!'' सत्यजीतच्या या म्हणण्यावर सगळ्यांनीच माना डोलावल्या. ज्याने पुढाकार घेऊन हे स्नेहसंमेलन घडवून आणलं, तो कार्तिक तर आपल्याच घरचं कार्य असल्यासारखं इकडून-तिकडे मिरवत होता, अगदी सूट घालून. नशीब की शाळेने हा मोठा हॉल वातानुकुलीत केलाय. नाहीतर भावनांनी ओलचिंब होत असताना घामानेही ओलंचिंब होण्याची वेळ आली असती पठ्ठ्यावर.

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे वयाची पंचावन्नी गाठलेल्या या 'बॅच'च्या इंग्रजीच्या शिक्षिका लिमयेबाईही या मेळाव्याला आल्यात. 'मॅन इज द आर्किटेक्ट ऑफ हिज ओन फॉरच्यून!' लिमयेबाईंचं हे वाक्य ऐकता-ऐकता ही मुलं मोठी झाली. एस.एस.सी. होऊन शाळेतून बाहेर पडली, ती हे वाक्य मनात साठवत आणि पुन्हा-पुन्हा आठवतच. कर्तृत्वाच्या पायऱ्या चढताना ह्या वाक्याची शिदोरी कायम स्वत:पाशी बाळगतच, आत्ता तेच वाक्य मोठ्याने उच्चारत लिमयेबाईंचा सत्कार करण्यात आला, शाल-श्रीफळ देऊन. बाई स्टेजवरच्या मधोमध ठेवलेल्या सुशोभित खुर्चीवर स्थानापन्न झाल्यावर कार्तिकने पुढल्या कार्यक्रमाला सुरुवात केली.

''मित्रांनो, गेल्या चाळीस वर्षांत लिमयेबाईंचं हे वाक्य खोटं ठरणाऱ्या घटना आपल्या सर्वांच्या आयुष्यात घडल्या असतील. त्यांना या घटनांविषयी काही बोलावंसं वाटत असेल, त्यांनी लिमयेबाईंच्या उपस्थितीत आपलं मन मोकळं करायला हरकत नाही.'' लगेचच मिहीर, सुशांत, राहुल, अंकित असे सगळे हॉलमधून इथून-तिथून येऊन स्टेजवर चढले. लिमयेबाईंच्या डावी-उजवीकडच्या खुर्च्यांवर ते स्थानापन्न होईपर्यंत कार्तिकचं पुढचं बोलणं चालूच होतं.

''मित्रांनो, बुद्धी, मेहनत, कर्तृत्व कसाला लावत आपण आयुष्य घडवण्याचा प्रयत्न करतो. पण हे सर्व करताना नशिबाचा हात आपल्या हाताच्या तळव्यावर पालथा पडतोच असं नाही. मला आठवतं की माझं आडनाव 'साठे' असल्यामुळे माझ्या आधी निबंधाच्या वह्यांच्या गठ्ठ्यात सुधांशू रानडेची वही असायची. त्याचा भन्नाट निबंध वाचल्यानंतर माझ्या निबंधाला बाई कसे चांगले मार्कस् देणार? पण माझ्यानंतर गठ्ठ्यात वही असायची ती संदीप सुपनेकरची. माझ्या फुसक्या निबंधाच्या पार्श्वभूमीवर संदीपला मस्त मार्कस् मिळून जायचे निबंधात. नंतर मी विज्ञानशाखेकडे वळलो, म्हणून टिकलो. नाहीतर या निबंधांनी एवढे निर्बंध घातले असते माझ्या वाटेवर, की अडथळ्यांच्या शर्यतीतच पळतोयसं वाटलं असतं मला.''

कार्तिकच्या हातातून कॉर्डलेस माईक घेत अंकित म्हणाला, ''हा अनुभव पुढे बोर्डाच्या किंवा युनिव्हर्सिटीच्या परीक्षा देत असतानाही आपल्याला तारत किंवा मारत असणारच. एखाद्या खूप हुशार विद्यार्थ्यांच्या पाठोपाठ आपली उत्तरपत्रिका परीक्षकांच्या हातात पडणं, ही आपल्या कमनशिबाची कसोटीच म्हणायची. याउलट आपल्याआधी एखाद्या सामान्य विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका तपासली गेली, तर तिच्या तुलनेत आपल्या उत्तरपत्रिकेला अधिक गुण मिळू शकतात. शिवाय पेपर तपासणाऱ्या व्यक्तीची मन:स्थिती ठीक नसली तर त्याचाही परिणाम उत्तरपत्रिकेत मिळणाऱ्या गुणांवर झाल्यावाचून राहत नसणारच.''

''यावरून नुकतीच माझ्या मुलीच्या बाबतीत घडलेली घटना आठवली ती सांगतो.'' मिहीरने माईकशिवायच बोलायला सुरुवात केलेली पाहून अंकितने पुढे होऊन त्याच्या हातात माईक दिला. ''माझी मुलगी गेल्या महिन्यात एका नृत्यस्पर्धेसाठी गेली होती. स्पर्धक खूप मोठ्या संख्येने आलेले पाहून ती खचलीच होती. त्यातच तिने निवडलेल्या गाण्यावर तिच्या आधीच अन्य दोन स्पर्धकांनी नृत्य केलेलं पाहून ती अगदीच मलूल होऊन बसली. पण पठ्ठीचं नशीब असं, की तिच्या आधीच्या स्पर्धकाने इतकं सुमार नृत्य केलं की माझ्या मुलीचं नृत्य सुरू झाल्यावर प्रेक्षकांनी सुरुवातीपासूनच टाळ्यांचा ठेका धरला. माझी मुलगी पट्टीची नृत्यांगना आहे. पण तिचे नृत्यगुण आधीच्या सुमार नृत्यामुळे परीक्षकांना अधिक प्रकर्षाने जाणवले असणार यात शंका नाही.''मीहिरचं बोलणं संपलेलं पाहून सुशांतने माईक घेतला.

''स्पर्धाच्या या युगात आपण स्पर्धक म्हणून कितव्या क्रमांकावर आपली कला सादर करण्यासाठी उभं राहतो, त्यावरही आपलं यश अवलंबून असतं. सर्वात सुरुवातीला जो स्पर्धक भाषण, गायन, नृत्य, अभिनय अशा कुठल्याही कलेच्या सादरीकरणासाठी उभा राहतो, त्याच्यावर गुणांच्या दृष्टीने अन्याय होण्याची शक्यता असते. कारण परीक्षक स्थिरावलेले नसतात. तुलनात्मक विचार करण्यासाठीही त्यांच्या पुढ्यात दुसऱ्या कुठल्या स्पर्धकाचा पर्याय नसतो. शिवाय खूप स्पर्धक असले, तर निकाल लागेपर्यंत पहिल्या क्रमांकाचा स्पर्धक परीक्षकांच्या स्मरणातून गेला असण्याची शक्यता असते.''

''हो, पण वक्तृत्वस्पर्धा असली, विषयही दिलेला असला, तर मात्र उशीरात उशीरा ज्याचा नंबर असेल, त्याची वाट लागते. तो स्पर्धक बोलेपर्यंत आधीच्या स्पर्धकांकडून सगळे मुद्दे सांगून झालेले असतात. ज्यावर बोलावं असा एकही मुद्दा शिल्लक राहिलेला नसतो. शिवाय तेच- तेच मुद्दे ऐकण्याच्या मनस्थितीत परीक्षकही नसतो.'' सुशांतच्या या मुद्याला खूपच टाळ्या पडल्या.

''या चौघांनी आधीच सगळ्या मुद्यांचा फडशा पाडून मला अगदी रिकामं करून ठेवलंय.'' राहुलने एकाच वाक्यात पूर्ण भाषणाइतक्या टाळ्या घेतल्या आणि सगळे स्टेजवरून खाली उतरले. लिमयेबाई काय बोलतात ते ऐकायला सगळे उत्सुक होते.

''मुलांनो, (सगळे हसले) पंचावन्न वर्षांचे झालात तरी माझ्यासाठी तुम्ही अजून मुलंच आहात. तुमचं आयुष्य सुंदर घडावं म्हणून 'मॅन इज द आर्किटेक्ट ऑफ हिज ओन फॉरच्यून' असं नेहमी म्हणत असे मी. पण नशिबाचे तडाखे मी तेव्हाही झेललेले होते. तुमचं शालेय जीवन संपवून तुम्ही महाविद्यालयात प्रवेश केल्यानंतरही अनेक संकटं माझ्या आयुष्यात आली. पण आपणच आपल्या यशाचे शिल्पकार असतो असं मनाला पटवत पटवतच मी पुढची वाटचाल करत राहिले. त्या वाक्याने तुम्हाला आधार द्यायचा प्रयत्न केला, त्याच वाक्याने स्वत:लाही आधार देत राहिले. आजपर्यंत तुम्हाला माझ्या वाक्याची आणि माझीही आठवण राहिली याबद्दल खरंच मी तुमची खूप-खूप आभारी आहे.''


लिमयेबाईंना पुढे बोलवेना. कार्तिकने त्यांच्या हातातून माईक घेतला खरा, पण त्याचाही गळा दाटून आला होता. सुटाच्या एवढ्या खिशांपैकी कोटाच्या खिशात रुमाल आहे की पँटच्या, हेही आठवेना त्याला. तेवढ्यात लिमयेबाईंनी पर्समधून टिश्यू-पेपर काढून दिला आणि निभावलं एकदाचं.

समाप्त.

*

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४००००८

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# सुरक्षा जाँच!

## (Security Check!)

**-अजित मानकर**

युरोप अमेरिकेमध्ये आन्तर्देशीय विमानतळ हे आपल्या येथील एस.टी. बस डेपोपेक्षा फारसे वेगळे नसतातच! तीच ती प्रचंड गर्दी आणि गोंधळ! अशाच एका प्रसंगी Boston/ New york प्रवासासाठी मी आणि तेजस्विनी Boston विमानतळावरील लांबच लांब रांगेत सुरक्षा जाँचेच्या प्रतिक्षेत बराच काळ उभे होतो. आमच्या मागे एक बहुधा पूर्व युरोपातील देशामधून आलेला मध्यमवयीन ४-५ स्त्रीयांचा थवा उभा होता. सर्वजणी नटून थटून नखरा करून आल्या होत्या व तद्देशीय भाषेत आपआपसांत संभाषणांत मश्गुल होत्या. जसजसा आमचा क्रम तपासणीसाठी जवळ येऊ लागला तसे आम्ही सराईतांप्रमाणे आमची पादत्राणे / मोबाईल फोन/घड्याळे/पाकिटे/ खिशातील चाव्या व पैसे /हँडबॅग्ज वगैरे सर्व वस्तू अंगावरून उतरवून बाजूच्या ट्रेमध्ये जमा केल्या जेणेकरून त्या सर्व वस्तू एक्स-रे मशिनमधून तपासणीसाठी पुढे धाडण्यात आल्या. आम्ही आमचे सामान व पादत्राणे उतरवताच मागील थव्यातील एक बाई मोठ्याने आम्हास ऐकू जाईल या पद्धतीने सफाईदार इंग्रजीत कुत्सितपणाने हसत उपहासाने म्हणाली की 'हे सर्व पादत्राणे व इतर गोष्टी काढण्याचे सोपस्कार आपणास करावे लागणार नाहीत, कारण आपण युरोपमधून आलेली मंडळी आहोत! सबब आपणा सर्वांस ह्या नियमामध्ये खास सूट आहे. हे सर्व नियम फक्त काळ्या वंशाच्या लोकांसाठीच लागू आहेत. आपण थोडेच ह्यांच्यासारखे अतिरेकी वाटतोय?'' मी सर्व संभाषण ऐकले पण आमचा क्रम तपासणीसाठी आलेला असल्यामुळे त्या बाईकडे दुर्लक्ष करून सुरक्षा जाँचेसाठी पुढे सरसावलो, आणि सर्व सोपस्कार सुरळीत आटपून आमची पादत्राणे व इतर गोष्टींचा ताबा घेण्याच्या गडबडीला लागलो.

इतक्यात मागे काही गडबड व गलका ऐकू आला. मग समजले की ह्या हट्टी विदूषींनी सुरक्षा अधिकाऱ्याबरोबरच चक्क सुरक्षा जांचेच्या नियमाविरुद्ध वाद घालावयास सुरुवात केली होती! त्यांच्या कांगाव्याप्रमाणे सुरक्षा अधिकारी त्यांना अपमानास्पद वागणूक जाणीवपूर्वक देत होता, जी फक्त आमच्यासारख्या काळ्या लोकांसाठीच त्यांच्या मते योग्य होती. अधिकाऱ्याने प्रथम त्यांना सौम्य शब्दांत समजावले की ही सुरक्षा जाँच सर्वांसाठीच बंधनकारक आहे, पण ह्या बाया काही सहकार्य करायलाच तयार नव्हत्या. रांगेतील मागील मंडळींचा मात्र ह्या प्रकाराने नाहक खोळंबा होत होता. अखेरीस वरिष्ठ सुरक्षा अधिकारी तेथे धावत आला. त्याने शांतपणे प्रथम त्या बायकांना बाजूस सारले व मागील खोळंबा झालेल्या रांगेचा मार्ग खुला केला. त्यानंतर त्या सर्व बायकांना सुरक्षा यंत्रणेला सहकार्य न केल्यामुळे व त्यांच्यावरील संशय बळावल्याने बाजूच्या खोलीत नेण्यात आले व तेथील स्त्री रक्षक कर्मचाऱ्यांमार्फत ह्या चमूची कसून झडती घेण्यात आली. तद्दन एक्स-रे मशीनमधून सर्वांचे Body-Scanning (अंगवस्त्रांसहित मशिनने घेतलेली झडती) करण्यात आले व नंतर त्यांच्याजवळ आक्षेपार्ह असे काहीच न आढळल्यामुळे बराच वेळ प्रश्नोत्तरासाठी अटकावून नंतर सोडून देण्यात आले! पण निष्कारण मनस्ताप व Body-Scanningची नामुष्की मात्र त्यांच्या पदरी आली. केव्हढे हे दुर्दैव व मानहानी!

जेव्हा आम्ही विमानात चढण्यापूर्वी Lounge मध्ये वाट पहात बसलो होतो तेव्हा काही वेळाने हा जथ्था झडती आटोपून आमच्या समोरून परेड करून पुढे गेला. मात्र त्यापैकी एकीचीही तेव्हा आम्हा उभयतांकडे नजर वर करून बघण्याची हिंमत झाली नाही! असो!

आम्ही केलेल्या एका Europe Tour मध्ये आमच्या बरोबर एक लिमये नावाचे पुण्याचे जोडपे होते. दोघेही प्रथमच परदेश वारीवर निघाले होते व अगदी सर्वसाधारण माणसांसारखेच दिसत होते की ज्यामुळे कुणालाही त्यांच्याबद्दल वावगा संशय येऊ शकला नसता. आमचा सर्व ३० माणसांचा चमू संपूर्ण २७ दिवसांच्या युरोप प्रवासात किमान ८ वेळा वेगवेगळ्या सुरक्षा यंत्रणांच्या तपासणीतून तावून सुलाखून बाहेर पडला होता. अपवाद फक्त ह्या श्री लिमये काकांचाच! प्रत्येक वेळी Electronic Entry Frame मध्ये श्री. लिमये पाय टाकणार इतक्यात मागून त्यांच्या पाठीवर एक जोरात थाप पडत होती व त्या पाठोपाठ सुरक्षा अधिकाऱ्याची लाईनीतून बाजूला येण्याची करडी आज्ञा! मग ओघानेच त्यांची हातातील बॅग संपूर्ण उघडून उलटसुलट उस्कटली जायची व नंतर सर्वांत शेवटी सोडून देण्यात येई!

हा प्रकार सतत चालू राहिल्याने श्री लिमये मात्र प्रवासाला फारच कंटाळून गेले होते. एके दिवशी त्यांनी त्यांची ही व्यथा मजजवळ बोलून दाखवली. तेव्हा मी त्यांचा Pass-Port बघावयास मागितला व उघडून बघितला देखील. त्यानंतर मी त्यांना खाजगीत सांगितले की Pass-Port वरील जुना ८ वर्षांपूर्वीचा फोटो त्यांचा घात करीत असावा. फोटोमध्ये त्यांनी तेव्हा दाढी राखली होती. आता मात्र इथे श्री लिमये प्रवासात दाढीशिवाय फिरत होते! साहजिकच Pass-Port पाहून सुरक्षेमध्ये त्यांच्या दाढीमुळे संशय व गोंधळ निर्माण होत होता. मी त्यांना पुढे समजावले की समजा तुम्ही फोटोप्रमाणेच दाढी राखून प्रवास केला असतात तरी देखील हाच अनुभव तुमच्या वाट्याला आला असता. कारण की Europe/ America ह्या देशांमध्ये ९/११ झाल्यापासून दाढीवाल्या माणसांवर संशयित अतिरेकी समजून नेहमीच कठोर तपासणी होत असते. तात्पर्य काय की Pass-Portवरील फोटोमध्ये अगर प्रत्यक्ष जरी तुम्ही दाढीधारक असाल तर इथे सुरक्षा जाँचेचा हा प्रकार सदैव तुमच्या वाट्याला येणारच!'' असो!

तिसरा प्रकार देखील मी ह्याच Europe Tour वर अनुभवला. आमच्याबरोबर एक नाईकनवरे हे जोडपे प्रवास करीत होते. श्री नाईकनवरे हे स्वतः नाजूक गोरेगोमटे, बुटके, दिसावयास सुंदर पण किंचित बायकी धाटणीचे वाटत होते. बोलावयास लागले की त्यांचा आवाजही बायकी थाटाचा येत होता. असो. जेव्हा शेवटी टूर संपवून आम्ही सर्व मुंबईला परत येण्यासाठी हिथ्रो ह्या लंडनच्या विमानतळावर आलो, त्याही वेळी आमच्या ग्रुपमधून २ गृहस्थांना सुरक्षा जाँचवाल्यांनी बाजूस काढले. त्यातील एक म्हणजे अर्थातच आमचे दाढी फेम श्री. लिमयेकाका व दुसरे हे श्री नाईकनवरेसाहेब!

श्री. लिमयांची अडचण आम्हा सर्वांना माहीत होती पण प्रथमच श्री नाईकनवरेंना सुरक्षा जाँचमध्ये का अडकवले हा सर्वांसाठीच एक यक्ष प्रश्न होता!

शेवटी एकदाची तपासणी पूर्ण होऊन श्री नाईकनवरे बाहेर आले तेच मुळी घाबरेघुबरे व लंडनच्या त्या थंडीतही घामाघुम होऊनच! आम्ही त्यांना बसावयास जागा दिली व एक ग्लास पाणी प्यावयास ताबडतोब दिले. घाम पुसत श्री नाईकनवरेंनी एक प्रदीर्घ निश्वास सोडला. त्यांच्या म्हणण्यानुसार तेथला सुरक्षा अधिकारी खोलीमध्ये सारखा त्यांच्या अंगलटीस येत होता. जास्त करून त्यांची छाती व पृष्ठभागावरून हात फिरवण्याकडे त्याचा जास्त कल वाटत होता.

जेव्हा हा प्रकार आम्ही टूर गाईडच्या कानावर घातला तेव्हा त्याने दिलेले उत्तर बुचकळ्यात पाडण्यासारखेच होते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, 'सध्या सर्व युरोपभर समलिंगी बायका व पुरुषांची विकृत चळवळ जोर धरीत आहे. ह्या लोकांच्या मागण्या अशा आहेत की त्यांच्या समलिंगी संबंधांना लग्नाचे कायदेशीर स्वरूप मिळावे व समाजात इतरांसारखीच समान वागणूक व इभ्रत प्रत्येक क्षेत्रात त्यांना मिळावयास हवी. इथली युरोपीयन सरकारे देखील ह्या वर्गाकडे मतांच्या आशेने उदारमतवादी धोरणे अवलंबित आहेत. सबब, त्यांच्याबद्दल कुठलाही आकस न बाळगता त्यांना नोकऱ्या व इतर संधी इथे उपलब्ध केल्या जाताहेत. हा जो सुरक्षा अधिकारी श्री नाईकनवरेंची चौकशी करत होता तोही कदाचित ह्याच मनोवृत्तीचाच एक भाग असावा.!''

मला काही ही सारवासारवी रुचली नाही. समजा, जरी मान्य केले की हा अधिकारी Gay वर्गात मोडणारा असला, तरी नोकरीच्या ठिकाणी हे बीभत्स व किळसवाणे प्रकार कोण सहन करणार!

अर्थातच आम्ही सर्व प्रवासी २७ दिवसांच्या प्रदीर्घ प्रवासाच्या ताणामुळे अगदीच थकलेलो होतो. अंगात त्राण न राहिल्यामुळे प्रत्येकालाच कधी एकदा विमान पकडून मुंबई गाठतो ही घाई झाली होती म्हणूनच अधिक लफडी नकोत ह्या विचाराने कुणीही हा प्रकार ताणला नाही! श्री नाईकनवरे साहेबांनी तर नाहीच नाही!

✳

## अभिनंदन

✳ ९ नोव्हेंबर २०१४च्या 'मार्मिक' मध्ये निशा त्रिलोकेकर -सोपारकर यांच्याविषयी लेख प्रसिद्ध झाला.

✳ श्री. अभिजित भूषण प्रधान यांना श्रीलंका येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्क्रॅबल स्पर्धेत पारितोषिक प्राप्त झाले. ते लक्ष्यवेधी आहे कारण त्यांनी तयार केलेला शब्द जागतिक विक्रमांचा उच्चांक मोडत सर्वाधिक अक्षरांचा ठरला. याला Spindler असे नाव आहे. त्यांच्या या विश्वविक्रमाचा प्रभुतरुणाच्या वर्धापनदिनी गौरवपूर्ण उल्लेख केलाच होता. त्यांचे पुन्हा एकदा खास अभिनंदन.

✳ पाली येथील नवघर तालुक्यातील सुधागड येथे श्री. स्वामी समर्थ आणि विश्वकर्मा यांच्या देवळाची दिनांक १२-५-२०१३ रोजी स्थापना झाली. सदर देवळाची जागा श्री. शरद कोठारे यांची सूनबाई असणाऱ्या श्रीमती चंद्रप्रभा उल्हास कोठारे यांनी दान केली आहे. गावकऱ्यांनी योग्य सहकार्य केले आणि श्रीमती चंद्रप्रभा कोठारे यांनी देवळात श्री स्वामी समर्थ यांची मूर्ती स्थापन केली. सत्कर्मी दान केल्याबद्दल चंद्रप्रभाबाईंचे अभिनंदन.

लेखांक-११

# केल्याने देशाटन

— हेमलता केशव कोठारे

येथे फार पूर्वी आलेल्या लोकांचे जुने सामान उदा. त्यावेळच्या बॅगा, कपडे, बूट किंवा इतर प्रवासी सामान नमुना दाखल ठेवण्यात आले आहे. तसेच आलेल्या लोकांचे निवडक सुंदर फोटोही ठेवण्यात आले आहेत. तेथून पुढे लिबर्टी बेटावरील स्वातंत्र्य देवतेचा भव्य-दिव्य पुतळा बघितला. पूर्वी लिबर्टी बेटाचे नाव 'वेडलोव' असे होते. परंतु १९५६ साली ते बदलून 'लिबर्टी आयलंड' असे करण्यात आले. ह्या स्वातंत्र्य देवतेचा पुतळा बनविण्यात फ्रान्सचा फार मोठा वाटा आहे. १८८१ पासून 'वेडलोव' बेटावर ह्या पुतळ्याच्या कामाची सुरुवात पॅरीसमध्ये झाली. भेटवस्तू म्हणून हा पुतळा फ्रान्सकडून अमेरिकेला देण्यात आला. फ्रेंच स्थापत्यकार एडोअर्ड डी लेबोलेय (Edouard de Laboulaye) व फ्रेड्रीक ऑगस्टी बार्थोलडी (Frederic Auguste Bartholdi) या द्वयीने हे महान कार्य पूर्ण केले. ह्या पुतळ्याची उंची जमिनीपासून ३०५ फूट आहे. तर प्रत्यक्ष पुतळ्याची उंची १५१ फूट आहे. हा पुतळा तांब्याचा असून ह्याची जाडी २.३७ मि. मि. (साधारणपणे दोन पेन्सच्या जाडीएवढी) आहे. ह्याला जगातील आठवे आश्चर्य संबोधले जाते. हे अमेरिकेचे राष्ट्रीय स्मारक होय. स्मारकाच्या दहाव्या मजल्यावर एलिव्हेटरमधून जाता येते व पुतळ्याचे सौंदर्य जवळून बघावयास मिळते. तेथून न्यूयॉर्क बंदर, मॅनहॅटन बेट, ब्रुकलीन ब्रीज, स्टॅटन आयलंड व न्यू जर्सी हे सर्व देखावे बघावयास मिळतात. ह्या देवतेच्या उजव्या हातात स्वातंत्र्य ज्योत व डाव्या हातात अमेरीकेच्या घटनेचे (constitution) पुस्तक आहे. मशालीच्या ज्योतींना सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे. न्यूयॉर्कच्या 'पाथ रेल्वे'तून न्यूयॉर्क ते न्यू जर्सी असा प्रवास केला. ही रेल्वे समुद्राच्या खाली पाण्यात बांधण्यात आली आहे. ह्या रेल्वे स्टेशनमधून न्यूयॉर्कच्या बाहेर पडताक्षणी थोड्याच अंतरावर ''वर्ल्ड ट्रेड सेंटर''च्या जुन्या इमारतींची जागा बघितली. ज्या इमारती २००१ला दहशतवाद्यांनी नेस्तनाबुत केल्या होत्या. त्याचक्षणी जगातील एक बलाढ्य महासत्ता हादरली. व खडबडून जागी झाली. त्यातील एक इमारत बांधून पूर्ण होऊन त्यातील कामकाज सुरू झाले व दुसरीचे बांधकाम चालू होते. आता तेही पूर्ण झाले असावे. न्यूयॉर्कला समुद्राखाली बांधलेल्या टनेलमधून कारने प्रवास केला. आम्ही न्यूयॉर्कमध्ये ज्या ``Hatt" (हॅट) हॉटेलमध्ये वास्तव्यास होतो ते हॉटेल समुद्रात बांधण्यात आले होते. ह्या सगळ्या अत्याधुनिक बाबींचा अनुभव घेतल्यावर लक्षात येते की खरच! अमेरिका ही जगातील एक नि:संशय बलाढ्य महासत्ता होय. परंतु २००१ च्या दहशतवादी कारवाईने ह्या महासत्तेची, अर्थव्यवस्था बरीच कोलमडली आहे. तरीही नि:संशय न्यूयॉर्क सीटी ही मायानगरी आहे. परंतु न्यूयॉर्कमध्येही मुंबईसारखाच गजबजाट, ट्रॅफिक जॅम, टॅक्सी व इतर वाहनांचे हॉर्न ऐकावयास मिळतात. थोडीफार अस्वच्छता, आणि हे सर्व पाहून मुंबईची आठवण झाली आणि न्यूयॉर्कच्या प्रतिमेला तडा गेला. बरे असो. न्यूयॉर्कमधील दुसरी प्रचंड भव्य इमारत म्हणजे एम्पायर स्टेट बिल्डिंग. १९३१ साली ही बांधून पूर्ण झाली. त्यावेळी ती जगातील सर्वात उंच इमारत गणली जात असे. तिला १०२ मजले आहेत व इमारतीची उंची १४५३ फूट आहे. येथून संपूर्ण न्यूयॉर्क शहर बघता येते. न्यूयॉर्कनंतर वॉशिंग्टन डीसीमध्ये भ्रमण केले. हे अमेरिकेचे राजधानीचे ठिकाण. हे व्हर्जिनिया स्टेटमध्ये येते. वॉशिंग्टन डीसी म्हणजे वॉशिंग्टन डिस्ट्रीक्ट ऑफ कोलंबिया. येथील वैशिष्ट्य म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षांचे जेथे वास्तव्य असते ते 'व्हाइट हाऊस' ही पांढरीशुभ्र भव्य वास्तू दुरूनच बघितली. येथे सामान्यांना प्रवेश नसतो. ह्यात काँग्रेस मॅन व इतर मान्यवरांनाच प्रवेश मिळतो. कॅपीटल हील ही संपूर्ण पांढरी शुभ्र इमारत आहे. इमारतीवर मोठा उंच घुमट आहे. येथे युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेच्या सिनेटचा राज्यकारभार चालतो. त्याचेच समोर अमेरिकेचे उंच स्मारक (मॉन्युमेंट) आहे. आम्ही ४ जुलैला वॉशिंग्टन डी.सी.मध्ये होतो. ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन ह्या दिवशी सकाळी १० ते १२ मध्ये रस्त्यावरून दोन तासाची परेड असते. ही परेड रस्त्याच्या बाजूला खाली जमिनीवर शिस्तीत बसून (सर्वच बसलेले किंवा उभे होते) बघीतली. वेगवेगळ्या देशांचे चित्ररथ, (fiots) व बँडच्या तालावरील परेड बघण्यासारखी असते. ते बघताना दिल्लीच्या २६ जानेवारीची आठवण झाली. ४ जुलैला कॅपिटल हीलच्या इमारतीसमोरील स्मारकासमोर (भव्य मैदानासमोर) रात्री लाखोंनी माणसे सर्व सरंजामासकट (फोल्डींग खुर्च्या, चटया, खाण्याचे पदार्थ) जमलेले असतात. वॉशिंग्टन डी.सी. म्हणजे भव्य म्युझियमचे आगरच. बरेच अप्रतिम म्युझियम बघीतले. त्यातील 'स्पेस म्युझियम' विशेष स्मरणात राहिला. राईट बंधुंनी उडवलेल्या पहिल्या विमानापासून ते पुढील सर्व सुधारीत विमानांची मॉडेल्स ठेवण्यात आली आहेत. तसेच त्यांचा तांत्रिक इतिहासही देण्यात आला आहे. तेथे एक स्पेस वरील 'थ्रीडी' डॉक्युमेंटरी फिल्महीं बघीतली. एक वैशिष्ट्य म्हणजे हे सर्व म्यझियम्स विनामूल्य बघावयास मिळतात. परंतु वरील डॉक्युमेंटरी बघण्यास टिकीट काढावे लागेल.

''लायब्ररी ऑफ काँग्रेस'' ही म्हणजे मी पाहिलेल्या वास्तूंमधील सर्वात उत्कृष्ट स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना होय. ह्या स्थापत्याविषयी लिहायचे झाले तर ५-६ पानेसुद्धा अपुरी पडतील. ह्या वास्तूची निर्मिती सन १८०० मध्ये झाली. ही लायब्ररी म्हणजे जगातील सर्वात मोठे ज्ञानाच्या भांडाराचे प्रवेशद्वारच होय. वर्षाला सरासरी १.६ दशलक्ष लोक लायब्री काँग्रेसला भेट देतात. महत्वाची बाब म्हणजे सन १७७६ साली अमेरिकेस स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका अस्तित्वात आली. त्या स्वातंत्र्य कराराच्या (डिक्लरेशन ऑफ इंडिपेन्डन्स) हस्तलिखिताच्या प्रति (मूळ प्रत नव्हे) लोकांना वाचनासाठी ठेवण्यात आल्या आहेत. या काँग्रेस हाऊसच्या स्थापत्याचे वर्णन करावे तेवढे थोडेच. मोठमोठे पिलर्स, भव्य कमानी, लाकडांवरील अप्रतिम कोरीव काम, उत्कृष्ट पेंटिंग्ज, अप्रतिम रंगसंगती, उंच उंच भव्य छते. त्यावरील नक्षीकाम काय आणि किती वर्णन करावे. सर्वच अप्रतिम!

सन १७८९ ला काँग्रेसने घटनेत सुधारणा करून नवीन दहा बाबींवरील ''बिल ऑफ राइटस्'' (Bill of Rights) पास केले. हे बिल म्हणजे व्यक्तीगत हक्क व स्वातंत्र्याचे भक्कम द्योतक होय. पेंटागॉनची इमारत फार दुरून बघितली. येथील बोटॅनिकल गार्डन बघितले. हे राष्ट्रीय ऐतिहासिक गार्डन म्हणून प्रसिद्ध आहे. युनियन स्टेशन बघितले. हे जगातील एक भव्य स्टेशन होय. तसेच स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना होय. पेन्सीलव्हिनिया स्टेट मधील पिटस्बर्ग व ग्रोसिटी ही दोन शहरे बघीतली. पिटस्बर्गला भारतीयांचे सुंदर बालाजीचे मंदीर बघीतले. ग्रोसीटी ही कपडे व बूट ह्यांचे खरेदीकरीता प्रसिद्ध आहे. कारण येथे ह्या दोन वस्तूंवर विक्रीकर आकारला जात नाही. त्यामुळे येथे खरेदीकरिता अमेरिका तसेच कॅनडातील बरेच लोक येतात.

ह्यानंतर मी पाहिलेले अमेरिकेतील मोठे शहर म्हणजे 'शिकागो' हे होय. शिकागोला आमचा ५ दिवसांचा मुक्काम होता. शिकागोत प्रवेश करतेवेळी सर्वप्रथम कशाची आठवण झाली असेल तर ती स्वामी विवेकानंदांची. त्यावेळी ह्याच शिकागोमधील लोकांना त्यांनी आपल्या भाषण प्रभुत्वाने काबीज केले तेच हे ठिकाण. ही जगातील एक वरच्या क्रमांकाची सिटी समजली जाते. तीनशे वर्षांपूर्वी हे शहर वसले. येथे सर्वप्रथम आयरीश, पोलीश व इटालियन लोक आले. पुढे सर्व देशातील लोकांनी येथे हळुहळू वास्तव्य केले. शिकागो हे मिशिगन स्टेटमध्ये येते. अमेरिकेतील पाच मोठ्या सरोवरांपैकी मिशिगन लेक शिकागो शहराला लाभला आहे. तसेच येथे शिकागो रिव्हरही आहे. अमेरिकेतील इतर चार मोठी सरोवरे इतर देशातही विभागली गेली आहेत. परंतु वैशिष्ट्य म्हणजे मिशिगन सरोवर हे एकमेव सरोवर विभागले गेले नाही. ते फक्त अमेरिकेतच सामावलेले आहे. सन १८७१ मध्ये शिकागो शहराला प्रचंड आगीत होरपळावे लागले. त्यावेळी शिकागो शहराची लोकसंख्या तीन लाख होती. (तेथील वील्स टॉवर बघताना दिलेल्या तपशीलावरून) त्या आगीने १०,००० इमारतींना वेढले. अगणित मनुष्य व आर्थिक हानी झाली. परंतु हीच हानी पुढे उत्कृष्ट शिकागो शहर बनविण्यास कारणीभूत ठरली. व जगातील एक अप्रतिम शहर बनण्याचे वरदान ठरले. जगातील उत्तमोत्तम स्थापत्यकारांनी एकाहून एक सरस इमारती शिकागो शहराला दिल्या. ज्या आज मोठ्या दिमाखात उभ्या आहेत. शिकागो बघताना तेथे एक आर्किटेक्टरल टूर असते. त्या टूरमध्ये जाताना गाईड दिसणाऱ्या इमारतीचा सर्व ऐतिहासीक तपशील सांगतो. शिकागोला 'हॅरॉल्ड वॉशिंग्टन लायब्ररी सेंटर' आहे. जिचा जगातील दोन क्रमांकाची सार्वजनिक लायब्ररी म्हणून उल्लेख होतो. पहिल्या क्रमांकावर लंडनमधील 'ब्रिटीश लायब्ररी' आहे. शिकागोत एकाहून एक उत्तमोत्तम इमारती बांधल्या आहेत. त्यातील एक महत्त्वाची इमारत म्हणजे विलीस टॉवर (Willis Tower) होय. जुलै २००९ पर्यंत या इमारतीचे नाव 'सीअर्स टॉवर' (sears tower) असे होते. ही १०८ मजली इमारत आहे. ही १९७३ मध्ये संपूर्ण बांधली गेली. त्यावेळी ती जगातील सर्वात उंच इमारत होती. व हे रेकॉर्ड २५ वर्षे टिकले. आजही युनायडेड स्टेटमधील ती सर्वात उंच इमारत आहे. तसेच जॉन हॅनकॉक (John Hancock) बिल्डींगही उत्कृष्ट आहे. अशा एकाहून एक स्थापत्याच्या दृष्टीने विविधता व आधुनिक तांत्रिकतेच्या दृष्टीने उत्कृष्ट इमारती शिकागोमध्ये आहेत. मोठमोठे पार्कस आहेत. त्यातील एक महत्त्वाचा उत्तम पार्क म्हणजे शिकागोमधील 'मिलेनीयम पार्क' हा पार्क म्हणजे शिकागोची शान आहे. शिकागोचे एक वैशिष्ट्य म्हणजे 'नेव्ही पीर (Navy Pier) हे १९१६ साली बांधले गेले. हे म्युनिसिपल पीर नं २ आहे. मिशीगन सरोवरात ३००० फूट बांधले गेले आहे. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकन नेव्हीचे ट्रेनिंग या ठिकाणी होत असे. १९९५ साली हे नेव्ही पीर हे

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिभा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

३०-०९-१४ श्री. विक्रम सुनील जयकर, कन्या, बोरीवली

### आत्याबाई नाव बोला

कु. व्हिधाना विक्रम सुनील जयकर, बोरीवली

### नांदा सौख्यभरे

२९-११-१४ कु. शमिता राजीव माधव राव, श्री. प्रशांत बाळाराम मोहिते (आं.ज्ञा.)

### विवाह रौप्यमहोत्सव

०३-१२-१४ श्री. विनोद माधव प्रभाकर, कु. वर्षा सुबोध गोरक्षकर

### विवाह सुवर्णमहोत्सव

१२-१२-१४ श्री. सुबोध नारायण कोठारे, कु. तारिणी रामदत्त देसाई
१४-१२-१४ श्री. अजय शामसुंदर तळपदे, कु. इना चंद्रसेन नवलकर
२६-१२-१४ श्री. विनोद गजानन प्रधान, कु. प्रतिमा शामराव तळपदे

### मरण

१३-११-१४ श्री. सुभाष दत्ताराम राव, वय ७६, विरार
२२-११-१४ श्री. नरेंद्र त्रिलोकेकर वय

(पान १ कॉलम ४ वरून)



Philosophy Major, has been professionally doing web interfacing in web technology for over 15 years. Does own freelancing in web technologies, 361degree.net, has enhanced her hobby of photography under the name Sd Photography.

**Dr. Shilpa Suresh Jayakar**



Doctorate in Biotechnology, pursuing her creativity mainly in oil painting, also interested in many other things such as trekking, photography and learning languages.

**Mithil Kiran Navalkar**

MBA in marketing and MBA in finance, working in the life



insurance industry for last 9 years, and is passionate about dancing.

**Mrs.Kashmira Swapnil Vyavaharkar**



Daughter of Mr. Rajas Ajinkya and Mrs.Chandini Ajinkya and mother of Master Vihaan Vyavaharkar, a researcher by profession, hobbies include dancing, sports, traveling, cooking and reading.

**Mohnish Shete**

B'COM, director in self own Pvt. Ltd. Company dealing in surveillance system products, secretary/trustee in NGO- "Kalpavruksha Foundation, which provides medical assistance to the needy,



passionate about music, plays Indian rhythm instruments.

*

(पान ५ कॉलम ४ वरून)

सर्वसामान्यांच्या उपयोगासाठी व मनोरंजनासाठी खुले झाले. येथील क्रुजवरून मिशिगन सरोवरात विहार करून शिकागो शहराचा नजारा बघता येतो. शिकागो शहरातही विविध भव्य म्युझियम आहेत. ते बघीतले. शिकागो हे शैक्षणिकदृष्ट्याही प्रसिद्ध आहे. शिकागो विद्यापीठ हे जगातील एक उत्कृष्ट व उच्च दर्जाचे विद्यापीठ गणले जाते. आजपर्यंत जगात जी शैक्षणिक नोबल प्राईजेस मिळाली. त्यातील सर्वात जास्त प्राईजेस शिकागो विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मिळाली. शिकागोतील एक आकर्षण म्हणजे 'शिकागो थिएटर' हे थिएटर १९२१ साली बांधण्यात आले. मी ते २०१३ ला बघितले. आजही ते उत्तम स्थितीत ऐटीत उभे आहे. या थिएटरची गणना जगातील अग्रेसर थिएटरमध्ये केली जाते. १९२१ साली बांधलेल्या वास्तूचा बांधणीखर्च त्यावेळी ४ दशलक्ष डॉलर होता ह्या थिएटरची बसण्याची क्षमता ३८७० (सीटस्) आहे. ह्या वास्तूची भव्यता व वैभव बघून डोळे दिपतात. थिएटरची उंची १५० फूट आहे. शिकागो थिएटर म्हणजे स्थापत्याचा व शिल्पकलेचा उत्कृष्ट नमूना होय. ह्या वास्तूंची भव्य-दिव्यता बघून स्तिमित होतो. मुख्य म्हणजे १९२१ सालची वास्तूची ज्या तऱ्हेने जपणूक देखभाल केली आहे त्याचे कौतुक जेवढे करावे तेवढे थोडेच. शिकागोमधील वास्तव्य केवळ ५ दिवसांचे असल्याने संपूर्ण शिकागोमधील स्थळे बघणे शक्य झाले नाही. ती बघण्यास ८-१० दिवस हवेत.

२०१३ मधील हा माझा अमेरिकेतील शेवटचा प्रवास, २३ नोव्हेंबर २०१३ ला मी मुंबईस परतले. दीड वर्षानंतर पुन्हा मायभूमीस आले. मला तर कधीपासून भारतात कधी परतते ह्याचे वेध लागले होते. दुसऱ्या देशात कितीही सुखासीन व झगमगीत जीवन मिळाले तरी आपली जन्मभूमी कशीही असूदे, तिच्यात कितीही उणीवा असू देत. आपल्याला तीच प्यारी असते. आई गरीब, कुरुप असली तरी जशी प्रत्येकाला प्यारीच असते. तद्वतच मायभूमीचे आहे. ज्या मातीत आपण जन्मलो, वाढलो, बहरलो त्या मातीतील पाळमूळ दुसरीकडे रुजवणे ह्या वयात शक्य होत नाही हेच खरं! ही फक्त काळानुसार केलेली व व्यावहारीक तडजोड असते. आणि ती केली तरच स्वत:ला व इतरांना सुखकारक ठरते. शेवटी काय तर गड्या आपुला गाव बरा!

समाप्त.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह ॲंड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67